THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 28TH FEBRUARY 1895.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**सन १८८२ चा हिंदुस्थानचा कंपन्यांचा आक्ट ह्याअन्वयें नोंदलेल्या रेलवे कंपन्यांनीं रेलवे बांधीत असतांना भांडवलांतून व्याज द्यावें असें ठरविण्याकरितां आक्टाचा मसुदा.**

ज्या अर्थीं सन १८८२ चा हिंदुस्थानचा कंपन्यांचा आक्ट ह्याअन्वयें नोंदलेल्या रेलवे कंपन्यांनीं रेलवे बांधीत असतांना भांडवलांतून व्याज द्यावें असा ठराव करणें इष्ट आहे, त्या अर्थीं, खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहेः—

सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

१. (१) ह्या आक्टास, सन १८९९ चा हिंदुस्थानचा रेलवे कंपन्यांबाबतचा आक्ट असें ह्मणावें.

(२) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे, आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

व्याख्या.

२. ह्या आक्टांत, विषयास अगर संदर्भास कांहीं बाध येत नसेल तर,—

(१) "रेलवे" ह्या शब्दाचा अर्थ, सन १८९० चा हिंदुस्थानचा रेलवेंबाबद आक्ट, कलम ३, रकम (४), ह्यांत व्याख्या केलेली रेलवे, असा समजावा;

(२) "सदर्हू रेलवे" ह्या संज्ञेचा अर्थ, जी रेलवे बांधण्याच्यासंबंधानें, ह्यानंतर ठरविल्याप्रमाणें भांडवलांतून व्याज देण्याची परवानगी असेल, ती रेलवे, असा समजावा; आणि

(३) "रेलवे कंपनी" ह्या संज्ञेचा अर्थ, सन १८८२ चा हिंदुस्थानचा कंपन्यांचा आक्ट ह्याअन्वयें नोंदलेली आणि हिंदुस्थानांत रेलवे बांधण्याच्या व चालविण्याच्या कारणासाठीं अगर बांधण्याच्या किंवा चालविण्याच्या कारणासाठीं उभारलेली कंपनी असा समजावा; मग ती कंपनी अशा एकट्याच कारणासाठीं असली तरी चालेल अगर त्या कारणाशिवाय इतर कारणासाठींही असली तरी चालेल.

भांडवलातून व्याज देण्याबाबद.

३. कोणत्याही रेलवे कंपनीस, आपल्या भांडवलांतून, शेरांबद्दल खरोखर भरलेल्या भांडवलावर, ह्या कलमांत सांगितलेल्या मुदतीपर्यंत व त्यांत दाखल केलेल्या शर्तींस व

निर्बंधांस पात्र राहून, व्याज देण्याचा, आणि असें दिलेलें व्याज सदहू रेलवे बांधण्यास लागणाऱ्या खर्चाचा भाग ह्मणून भांडवलखातीं खर्च घालण्याचा, अख्त्यार आहेः—

(१) असें व्याज, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे ठरवितील त्या मुदतीपर्यंत मात्र दिलें पाहिजे ; आणि अशी मुदत, कोणत्याही प्रसंगीं, सदहू रेलवे ज्या साहामाहींत खरोखर पुरी होऊन ट्राफिकास खुली करण्यांत येईल त्या साहामाही नंतरच्या साहामाहीच्या शेवटच्या दिवसापुढें जाऊं नये.

(२) असें व्याज देण्याचा अधिकार त्या कंपनीच्या मेमोऱ्यांडम आफ् असोसिएशनअन्वयें किंवा त्या कंपनीनें केलेल्या विशेष ठरावाअन्वयें असल्याशिवाय, देतां कामा नये.

(३) असें व्याज देण्यास सदहूप्रमाणें कंपनीच्या मेमोऱ्यांडम आफ् असोसिएशनअन्वयें अगर विशेष ठरावाअन्वयें अधिकार असला तरी, तें व्याज गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांची आगाऊ मंजुरी घेतल्याशिवाय देतां कामा नये.

(४) सदहूप्रमाणें, कोणत्याही मुदतीबद्दल व्याज ह्मणून भांडवलांतून दिलेली रकम, कोणत्याही प्रसंगीं, त्या मुदतींत त्या रेलवेच्या झालेल्या नक्की उत्पन्नासह, दरसाल दर शेंकडा चार टक्यांहून जास्त होईल, इतकी असूं नये.

(५) सदहूप्रमाणें व्याज द्यावयाचें तें, तें व्याज ज्या शेर-भांडवलाच्यासंबंधानें द्यावयाचें असेल त्या शेर-भांडवलापैकीं निदान दोन-तृतीयांश रकमेचे शेर खरोखर काढण्यांत येऊन घेण्यांत आले आहेत अशी आणि त्या शेरांचे धारण करणारे अगर त्यांचे वारचे त्या शेरांबद्दल कायदेशीर रीतीनें जबाबदार आहेत अशी त्या रेलवे कंपनीकडून गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांची खात्री करून देण्यांत येई तोंपर्यंत देतां कामा नये.

(६) ज्या कोणत्याही शेर धारण करणाऱ्याच्या शेरांपैकीं कोणत्याही शेरांवरील कॉल ज्या मुदतीपर्यंत बाकी राहतील, त्या शेर धारण करणारास त्या मुदतीपर्यंतचें सदहू प्रकारचें व्याज मिळणार नाहीं.

(७) असें व्याज ज्या शेरांच्या संबंधानें दिलेलें असेल, त्या शेरांबद्दल भरलेली रकम, तसें व्याज दिल्यावरून कमी होईल असें समजूं नये.

रेलवे वाढविण्यासाठीं उभारलेल्या जास्त शेर-भांडवलास कलम ३ ह्यांतील ठराव लागू करण्याबाबद.

४. जी कोणतीही रेलवे बांधण्याचें काम चाललें असून जी एकाद्या रेलवे कंपनीनें आपल्या मालकीच्या अगर आपण चालवीत असलेल्या कोणत्याही रेलवेशिवाय इतर अगर तिचा वाढविलेला भाग ह्मणून तयार करावी अगर चालवावी असा इरादा असेल, ती रेलवे ह्या आक्टाच्या कारणांसाठीं त्या कंपनीची रेलवे आहे असें समजावें, आणि गेल्या शेवटच्या कलमांतील सर्व ठराव अशा रेलवेस आणि ती बांधण्याच्या कारणांसाठीं काढलेल्या शेर-भांडवलास लागू होतील असें समजावें.

व्यवस्थानिरूपणपत्रकामध्यें व इतर दस्तऐवजांमध्यें जाहिर करण्याबाबद.

५. जेव्हां कोणत्याही रेलवे कंपनीला ह्या आक्टाअन्वयें व्याज देण्याचा अधिकार असेल, तेव्हां, त्या कंपनीचे शेर लोकांनीं घ्यावे ह्मणून काढलेल्या प्रत्येक व्यवस्थानिरूपणपत्रकांत, जाहिरनाम्यांत अगर इतर दस्तऐवजांत आणि अशा प्रत्येक शेराच्या सर्टिफिकेटांत, तो अधिकार असल्याबद्दल लिहिलेलें असलें पाहिजे.

हिशेब.

६. कोणत्याही रेलवे कंपनीनें ह्या आक्टाअन्वयें कोणतेंही व्याज दिलें ह्मणजे, तें व्याज कोणत्या रकमेवर व कोणत्या दरानें दिलें तें त्या कंपनीच्या वार्षिक अगर इतर हिशेबांमध्यें दाखविलें पाहिजे.

कर्ज काढण्याच्या अधिकाराची इयत्ता कशी काढावी.

७. जर कोणत्याही मेमोऱ्यांडम आफ् असोसिएशनवरून, आर्टिकल्स आफ् असोसिएशनवरून अगर इतर दस्तऐवजावरून, कोणत्याही सभेच्या मंजुरीनिशीं किंवा मंजुरीशिवाय, पैसा कर्जी काढण्याचा अधिकार कोणत्याही रेलवे कंपनीस किंवा तिच्या डिरेक्टरांस दिलेला असेल, आणि ह्याप्रमाणें कर्जी काढण्याचा अधिकार असलेली रकम, त्या कंपनीच्या भांडवलाच्या अमुक प्रमाणानें असावी असें ठरविलेलें असेल, तर ह्या आक्टाअन्वयें व्याज देण्याच्या कामीं लाविलेली अगर लावावयाची भांडवलांतली रकम, सदर्हू प्रकारच्या कर्जी काढण्याच्या अधिकाराची व्याप्ति निश्चित करतांना, त्या कंपनीच्या भांडवलांतून बाद केली पाहिजे.

---

## हेतु व कारणें ह्यांचें निरूपण.

कोणत्याही कंपनीच्या देऊं केलेल्या भांडवलावर ज्या मुदतींत नफा मिळणें अशक्य असतें त्या मुदतींत त्या भांडवलाचा कोणताही भाग उत्पन्न गणूं न देण्याविषयीं जो निर्बंध विलायतच्या जाइंट स्टाक कंपन्यांच्या आक्टाअन्वयें नोंदलेल्या प्रत्येक कंपनीला विलायतच्या कायद्यांखालीं लागू होतो, तो निर्बंध, हिंदुस्थानांत वसलेल्या आणि हिंदुस्थानचा कंपन्यांचा आक्ट (सन १८८२ चा ६ वा) ह्याअन्वयें नोंदलेल्या कोणत्याही कंपनीस लागू आहे असें ह्या देशांतील कोर्टें ठरवितील असा संभव आहे. गेल्या सालाच्या मध्याच्या सुमारास पार्लमेंटानें पसार केलेला स्टाट्यूट ५७ व ५८, व्हिक्टोरिआ चाप्टर १२, ह्यावरून सदर्हू निर्बंध, इंग्लंडांत वसलेल्या परंतु हिंदुस्थानांत रेलवे बांधण्यासाठीं उभारलेल्या कंपन्यांच्या बाबतींत, काढून टाकण्यांत आला आहे. ह्या मसुद्याचा उद्देश, हिंदुस्थानांत वसलेल्या आणि सन १८८२ चा हिंदुस्थाचा कंपन्यांचा आक्ट ह्याअन्वयें नोंदलेल्या रेलवे कंपन्यांस, ह्या बाबतींत, इंग्लंडांत नोंदलेल्या कंपन्यांच्या बरोबरीला आणून ठेवावें, असा आहे.

(सही) अलेक्झांडर एडवर्ड मिलर.

तारीख ४ माहे फेब्रुवारी सन १८९५.

(True Translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS